# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस
आयुक्तालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व
ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २८६-२२ दिनांक २८/०९/२०२२

## गुगल पे पॉईंट्स रिडीम करुन घ्या असे सांगुन ओ.टी.पी. मागुन १९९९८/- रुपयांची फसवणुक झालेले पैसे परत मिळविण्यात नालासोपारा पोलीस स्टेशनला यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा परिसरातील श्रीप्रस्था येथे राहणारे, प्रशांत काशीनाथ कांबळे यांना दिनांक - १९/०८/२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० वाजताच्या सुमारास एका अनोळखी इसमाने तक्रारदार यांचे मोबाईल वर ९९९९/- रुपये व ९,९९९/- रुपयांचे गुगल पे पॉइंट्स कुपन पाठविलेले होते. त्यानंतर तक्रारदार यांना अनोळखी इसमाने सदरचे गुगल पे पॉईंट्स हे कुपन गुगल पे वरुन पासवर्ड टाकल्यानंतर तुम्हाला तुमच्या अकाऊंटवर क्रेडीट होतील असे तक्रारदार यांस भासवले त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचेकडील गुगल पे या ॲपलिकेशन वरुन पिन दाबल्यानंतर तक्रादार यांचे अकाऊंटमधुन अनुक्रमे ९९९९/- रुपये व ९,९९९/- रुपये अशी रक्कम कट होवुन तक्रारदार यांची फसवणुक झाली .

त्यानंतर तक्रारदार यांनी लागलीच एका तासाच्या आतच सायंकाळी ०८.३० वाजता नालासोपारा पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिला होता. नमूद तक्रारीबाबत पोलीस निरीक्षक/राहुल सोनवणे यांनी तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती तक्रारदार यांचेकडुन प्राप्त केली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणूक झालेली ९,९९९/- रुपये रक्कम हि प्रथम pay u या पेमेंट गेटवेद्वारे गेल्याचे चौकशीमध्ये निष्पंन्न झाले. त्याचप्रमाणे दुसरे ९,९९९/- रुपये हे cash free या ऑनलाईन पेमेंट गेटवेवर गेल्याचे समजले. नमुद पेमेंट गेटवेचे नोडल अधिकारी यांना पोलीस निरीक्षक / राहुल सोनवणे यांनी तात्काळ मेल करुन सदरचे व्यवहार थांबविण्याबाबत कळविले.

त्यानंतर पोनि. सोनवणे यांनी सदर कंपन्यांशी तात्काळ अधिक पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची फसवणूक झालेली रक्कम १९,९९८/- रुपये हे **pay u व cash free** या ऑनलाईन पेमेंट गेटवे यांचे मदतीने तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्याबाबतची कार्यवाही केली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एसएसएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देवू नये.
- आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ईमेल,कॉल्स यांची विश्वासहर्तांची पडताळणी करावी.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा **OTP** किंवा आपली वैयक्तीक माहिती देवू नये.
- तसेच फसवणुक झाल्याचे लक्षात येताच लागलीच नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा जेणेकरुन **Golden Hour Period** मध्ये फसवणुक झालेली रक्कम परत मिळविण्याकरीता मदत होईल.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, तसेच सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, श्री. चंद्रकांत जाधव , सहा. पोलीस आयुक्त नालासोपारा विभाग मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विलास सुपे, राहुल सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक/ अख्तर शेख यांनी पार पाडली आहे.

----ooo----